## निशाणी क्र. ५३ वरील आदेश

प्रतिवादी क्र. १ व २ याने प्रस्तुतचा अर्ज कैफियतमध्ये दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दाखल केला आहे.

२. त्यांच्या म्हणण्यानुसार, सदर कामातील प्रतिवादी क्र. २ ने नि. क्र. २९ लगत दिलेल्या कैफियतीमधील परिच्छेद क्र. ५ मध्ये शेवटच्या वाक्यात प्रतिवादींचे पुर्वजांचे नाव नजरचुकीने ''कै. भास्कर'' असे लिहले गेले आहे. त्याठिकाणी प्रत्यक्षात कै. कृष्णाजी असे लिहले जाणे आवश्यक होते व आहे. प्रतिवादींकडून कैफियत दिली जात असताना हस्त दोषामुळे व नजरचुकीने कैफियतीमधील लिखाणातील चुक दुरूस्त करून मिळणेस प्रस्तूत अर्ज दाखल केला आहे. खटल्यातील उलटतपास अद्याप सुरू झालेला नाही. प्रतिवादी मागत असलेली दुरूस्ती ही केवळ तांत्रिक व औपचारीक स्वरूपाची असून ती मंजूर झाल्यास कैफियतीचे स्वरूपात कोणताही बदल होत नाही. याउलट प्रतिवादींना कैफियत दुरूस्तीची परवानगी न मिळाल्यास लिखाणातील तांत्रिक चुकीचा गैरफायदा घेवून वादी अंतिम युक्तिवादाचे वेळेस त्याचा गैरवापर करण्याची शक्यता आहे. सबब प्रतिवादींना बचावाची न्याय संधी मिळण्याकरीता कैफियत दुरूस्ती परवानगी मिळणे गरजेचे आहे. नि.क्र. २९ लगत दिलेल्या प्रतिवादी क्र. २ चे कैफियतीमधील झालेली वरील लिखाणातील चूक प्रतिवादी क्र. १ ने दिलेल्या नि.क्र. ३६ लगतच्या कैफियतीमध्ये सुद्धा परिच्छेद क्र. ५ मध्ये झाली आहे. सबब प्रतिवादी क्र. १ च्या नि. क्र. ३६ लगत दाखल असणा—या कैफियतीमधील परिच्छेद क्र. ५ पृष्ठ क्र. ३ वर ''कै.भास्कर'' यांनी कै. रावजींना कर्ज रकमेची खरेदी हिश्यापूर्ती फेड करून कै. रावजीच्या संमतीने या वाक्यात देखील ''कै. भास्कर'' असे लिहले गेले आहे, त्याठिकाणी प्रत्यक्षात कै. कृष्णाजी असे

लिहले जाणे आवश्यक होते सदरची चुक सुद्धा दुरूस्ती करण्याची परवानगी प्रतिवादींना मिळावी अशी विनंती प्रस्तूत प्रतिवादींनी केली आहे. सबब न्यायाचे दृष्टीने प्रतिवादीचा कैफियत दुरूस्ती अर्ज मंजूर करणेत यावा अशी प्रतिवादींची विनंती आहे.

३. वादी याने सदर अर्जास म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकूर नाकारला आहे. त्याच्या म्हणणेनुसार, प्रस्तूतचा अर्ज टिकण्याजोगा नाही कारण प्रस्तूत अर्ज दाव्याच्या सुनावणीस प्रारंभ झाल्यानंतर दाखल करण्यात आला आहे. सदरचा अर्ज दोन वेगळे प्रतिवादींच्या दोन वेगळया तारखांना दिलेल्या दोन वेगळया कैफियतींमधील चूक दुरूस्त करणेचा आहे. दोन वेगळया कैफियतींमधील चुका या प्रस्तूतच्या एकाच अर्जाद्वारे दुरूस्त करून मागता येणार नाही. प्रतिवादी दाव्यात मागत असलेली दाद ही महत्वाची आहे. सबब प्रस्तूतची दुरूस्ती ही प्रतिवादीच्या पुराव्यात बदल घडवून आणणारी आहे जे वादीला बाधा आणणारे आहे. सबब या सर्व कारणास्तव अर्ज नामंजूर करण्याची विनंती वादी याने केली आहे.

४. वादी व प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

५. प्रस्तुतचा दावा वाटप पृथक कब्जा व निरंतर ताकिदीसाठी दाखल करणेत आला आहे असे दिसून येते. सदरची दुरूस्ती ही तांत्रिक स्वरूपाची दुरूस्ती आहे असे वाटते. प्रकरणामधील गुंतागुंत टाळणेसाठी सदर दुरूस्ती करणे आवश्यक वाटते. प्रस्तुत कामी पुराव्याचे कामकाज सुरू झाले असले तरी देखील नियोजित दुरूस्ती ही तांत्रिक स्वरूपाची असल्यामुळे अशा दुरूस्तीस परवानगी देण्यास अडचण वाटत नाही. प्रस्तुत दुरूस्तीमुळे दाव्याचे अगर कैफियतीचे स्वरूप बदलणार नाही असे वाटते. या दुरूस्तीमुळे वादीचे कसलेही नुकसान होईल असे वाटत नाही. सदरची दुरूस्ती ही केवळ तांत्रिक व

हस्तदोषाची आहे. सबब, प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे असे वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे:

## **आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने आजपासून १४ दिवसांचे आत कैफियतीमध्ये नियोजित दुरूस्ती करून कैफियत दुरूस्तीची प्रत दयावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : देवगड
दिनांक :०२/०३/२०२०

( बी.आर.पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

Digitally signed by Balkrishna Rajaram Patil
Date: 2020.03.03 10:45:18 +0530